पोलीस अधीक्षक कार्यालय,परभणी

दुरध्वनी क्रमांक – ०२४५२-२२६२४४ फॅक्स क्रमांक -०२४५२-२२३१५७

ई-मेल – sp.parbhani@mahapolice.gov.in आ.पु.क्रमांक 318 /२०२६


जा.क्र.आस्था-१/सपोउपनि-पदोन्नती/२०२५-२६/२०२६ परभणी, दि.12 .०३.२०२६

संदर्भ :- १.शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२,दि.०१.०८.२०१९
२. शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२,दि.१५.१२.२०१७
३. शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२,दि.३०.०८.२०१८
४. शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.०७.०५.२०२१
५. शासन निर्णय,गृह विभाग क्र.पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि.२५.०२.२०२२
६. शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/१६-ब,दि.१६.०६.२००८
७. शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी १०/२००४ /प्र.क्र.५७०/मावक-५, दि.०५.०३.२००५
८. शासन निर्णय सामामिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२००४/प्र.क्र. ५७०/ मावक-५, दि.१६.०५.२००७
९. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१२०७/प्र.क्र. ५३/०८/१६-ब, दि.१६.०६.२००८
१०. शासन निर्णय,समान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.२५.०५.२००४
११. विभागीय पदोन्नती निवड समितीने दि. ३०.१२.२०२५ रोजी घेतलेला निर्णय

--oo--

**आदेश**

परभणी जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस हवालदार यांना आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून वेतन मॅट्रिक्स एस-१० रु.२९२००-९२३०० मध्ये " **सहायक पोलीस उपनिरीक्षक** " या पदावर निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतर ते सध्या जेथे कार्यरत आहेत त्यांना त्याच ठिकाणी नेमण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवड सूचितील अ.क्र. | पो.हवालदार यांचे नाव,ब.नं | जात प्रवर्ग | पदोन्नतीने भरावयाचा प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदावर वाटप करण्यात आलेला वक्कल क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ३४ | पोह/६९८ कैलास हेमंत जाधव,नेमणूक एसआयडी | मराठा खुला | सेवाज्येष्ठतेने खुला प्रवर्ग | ५११० | सपोउपनि/५०२७ संजय सिताराम मुंढे यांचे नि.व.से.मुळे रिक्तपदी |
| २ | ३५ | पोह/१०१८ सम्राट अजितराव कोरडे,नेमणूक पो.स्टे.कोतवाली | जैन खुला | सेवाज्येष्ठतेने खुला प्रवर्ग | ५१२० | सपोउपनि/५२२५ माणिक केशव भोसले यांचे नि.व.से.मुळे रिक्तपदी |
| ३ | ३६ | पोह/३७४ रौनक पाशा खाजामिया कौसडीकर,नेमणूक जिविशा,परभणी | मुस्लीम खुला | सेवाज्येष्ठतेने खुला प्रवर्ग | ५१३५ | श्रेणी पोउपनि/५०४१ शिवाजी कमलाकर देशपांडे यांचे नि.व.से.मुळे रिक्तपदी |
| ४ | ३७ | पोह/९३१ शेख मोहमद गौस शेख खाजा,नेमणूक पो.स्टे.कोतवाली | मुस्लीम खुला | सेवाज्येष्ठतेने खुला प्रवर्ग | ५१३६ | श्रेणी पोउपनि/५०२३ मधुकर लक्ष्मण चव्हाण यांचे नि.व.से.मुळे रिक्तपदी |
| ५ | ३९ | पोह/३०३ दत्तात्रय तुकाराम गुंगाणे,नेमणूक पो.स्टे.जिंतूर | माळी इमाव | सेवाज्येष्ठतेने खुला प्रवर्ग | ५०४७ | सपोउपनि/५१५० बालासाहेब तुकाराम तुपसुंदरे यांचे नि.व.से.मुळे रिक्तपदी |

Scanned with OKEN Scanner

सदर पदोन्नती आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञया याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ नुसार मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने मा.सर्वोच्च न्यालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात आली आहेत.

**जे मागासवर्गीय कर्मचारी दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे कर्मचारी जे दि.२५.०५.२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला आहे. व दि.२५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला आहे.**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्रमांक : पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि.२५.०२.२०२२ मधील मुद्दा क्र.११ अनुसार पोलीस अंमलदारांची गुणवत्ता वर्धित होण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या टप्यावरील पदोन्नतीपूर्वी किमान १० आठवडयांचे पदोन्नती पूर्व प्रशिक्षण (Pre-Promotion Training) पोलीस प्रशिक्षण विद्यालय येथे अनिवार्य असेल.

उपरोक्त निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या पदोन्नतीच्या आदेशाधीन असलेल्या पोलीस अंमलदार यांचेविरुध्द गुन्हा दाखल झाला असेल / निलंबन कार्यवाही केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा शिक्षा भोगत असतील तर प्रभारी अधिकारी यांनी त्यांन पदोन्नती स्विकारण्यास परवानगी न देता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती तात्काळ खास दुतामार्फत या कार्यालयास सादर करावी. तसेच, भविष्यात कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणत्र, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण व अन्य त्रुटी आढळून आल्या / निदर्शनास आल्यास पोलीस अंमलदार यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या आदेशात बदल करण्याच्या अटींच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, पोलीस अंमलदार पदोन्नतीच्या दिनांकास शिक्षा भोगत असतील तर शिक्षा संपुष्टात आलेल्या दिनांकापासून पदोन्नतीचा प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय राहील.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्या-१२, दि.१२.०९.२०१६ मधील तरतुदीनुसार एखाद्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास, त्यांचे नाव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या निवड यादीतून काढून टाकण्यात येऊन पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूचिमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाचे निवडसूचित त्यांची पदोन्नतीसाठी पात्रता तपासण्यात येईल. तसेच, पोलीस अंमलदार पदोन्नती स्विकारण्यास इच्छूक नसल्यास तसा लेखी अहवाल प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास सादर करावा.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : वेतन-११०९/ प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०२०,शुध्दीपत्रक दि.२३.१२.२०१५ व दि.०२.०३.२०१९ अन्वये सेवांतर्गत सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर झालेला असेल व त्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना मंजूर करण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : पीएएचवाय-१०८२/सीआर/११०० (२)/एईआर-०३, दि.०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असले, तर पदोन्नतीवर

Scanned with OKEN Scanner

हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आत दयावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ मधील नियम १३ अन्वये केली जाईल व त्यानंतर कोणत्याही प्रकारची विनंती अथवा म्हणने ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झालेल्या पोलीस हवालदार यांचे पोलीस अधीक्षक, परभणी यांचेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.**

(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)
पोलीस अधीक्षक,परभणी.

प्रति,

सर्व संबंधीत पो.अंमलदार,परभणी जिल्हा

मार्फत :-पो.स्टे. / शाखा प्रभारी अधिकारी, कोतवाली,जिविशा,जिंतूर

प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी,परभणी शहर, जिंतूर, पोलीस उपअधीक्षक (मु),परभणी

प्रत :- अपर पोलीस अधीक्षक,परभणी

प्रत :- आ.पुस्तिका / जि.पो.प./ वेतन लिपीक, पो.अ.कार्यालय,परभणी

प्रत :- प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, परभणी.

२/- पो.स्टे. प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी यांना प्रसारणासाठी

प्रत :- जिल्हा कोषागार अधिकारी,परभणी

Scanned with OKEN Scanner